# <u>जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा</u>

## <u>सफाईगार व माळी पदाचे उमेदवारांकरीता</u>

## <u>सुचना</u>

जिल्हा व सत्र न्यायलय, वर्धाद्वारे सफाईगार पदाची निवड व प्रतिक्षा यादी तसेच माळी पदाची निवड यादी तयार करण्याचे अनुषंगाने दि. ०७/०४/२०२५ रोजी जाहिरात प्रकाशित करण्यात आलेली होती. तसेच दि. ०८/०५/२०२५ रोजी उमेदवारांकरीता सुचना प्रकाशित करुन सफाईगार व माळी पदाचे उमेदवारांना त्यांचे मुळ अनुभव प्रमाणपत्र पडताळणी करण्याकरीता या कार्यालयास सादर करण्याबाबत निर्देशित करण्यात आलेले होते.

तथापि, दि. ०८/०७/२०२५ रोजीच्या सुचनेच्या अनुषंगाने माळी पदाचे उमेदवारांना माळी कामाचा अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्राची प्राधिकृत अधिकाऱ्याचे सही व शिक्क्यासह सत्यप्रत करुन या कार्यालयास सादर करण्याबाबत निर्देशित करण्यात आलेले होते. परंतु काही उमदेवारांनी माळी कामाचा अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्राची सत्यप्रत या कार्यालयास सादर न करता त्यांचे मुळ प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केलेले आहे.

करीता सफाईगार व माळी पदाचे ज्या उमेदवारांनी त्यांचे मुळ अनुभव प्रमाणपत्र तसेच ज्या उमेदवारांनी अभ्यासक्रम पुर्ण केल्याबाबतचे प्रत्यक्षात मुळ प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केलेले आहे त्यांनी ते <u>प्रमाणपत्र दि. २७/११/२०२५ ते दि. १०/१२/२०२५ (सुट्टीचे दिवस सोडुन) या कालावधीत 'जिल्हा व सत्र न्यायालय', वर्धा येथून दुपारी ११.०० वा. ते ०५.०० वा. पर्यंत प्रत्यक्षात हजर राहून न चुकता प्राप्त करुन घ्यावे. तसेच या कार्यालयात हजर राहतांना स्वत:चे ओळखपत्र (आधार कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड व मतदान कार्ड इ. पैकी कोणतेही एक दस्तऐवज) सोबत घेवुन यावे.</u>

<u>तसेच उमेदवारांना पुढे असेही निर्देशित करण्यात येते की, जे उमदेवार उपरोक्त कालावधीत त्यांचे अनुभव प्रमाणपत्र प्रत्यक्षात हजर राहुन 'जिल्हा व सत्र न्यायालय', वर्धा येथून प्राप्त करुन घेणार नाही, त्या उमेदवारांचे अनुभव प्रमाणपत्राबाबत तसेच अभ्यासक्रम पुर्ण केल्याबाबतचे मुळ प्रमाणपत्राबाबत त्यांच्या कोणत्याही प्रकारच्या तक्रारीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही, उमेदवार सर्वस्वी जबाबदार राहील,</u> याबाबत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

26/11/2025

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
वर्धा

दिनांक : २६/११/२०२५.